# December 2023

तरुण भारत 6/12/23

## डॉ. धनंजय होनमाने यांचा मॉरिशसमध्ये डंका



कुंडल : प्रा.डॉ.धनंजय होनमाने यांनी मॉरिशस येथील विद्यापीठामध्ये शोधनिबंध सादर करताना.

वार्ताहर
कुंडल

येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयातील प्रा. डॉ. धनंजय होनमाने यांनी मॉरिशस येथे आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये मॉरिशस मधील वारकरी संप्रदायाचा उद्गम व विकास या विषयावर शोध निबंध सादर केला.

मॉरिशस विद्यापीठ, महात्मा गांधी इन्स्टिट्यूट, मॉरिशस व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने भारत मॉरिशेश आंतरसांस्कृतिक, राजनैतिक संबंध, कला साहित्य आणि संस्कृतीवरील प्रभाव याविषयावर परिषद होती.

होनमाने यांनी या शोधनिबंधात मॉरिशस येथे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय कसा रूढ झाला याचा शोध घेत, १८६४ मध्ये महाराष्ट्रातील पवार नावाची एक मजूर व्यक्ती मॉरिशसला आणण्यात आली. ती व्यक्ती पंढरपूरच्या विठ्ठलाची भक्त होती. महाराष्ट्रात विठ्ठल भक्ती वारकरी संतांनी तळागाळात पोहोचवली. त्या प्रभावानेच पवारांनी मॉरिशस येथेही विठ्ठलभक्ती सोडली नाही. नित्यनेमाने हरिपाठ भजन, पूजा-अर्चा करून विठ्ठलप्रतीचा भक्तिभाव जतन केला. मॉरिशस सरकारनेही कुणाच्याही धार्मिक भावनेला अडथळा न आणता मुक्त स्वातंत्र्य बहाल केले. त्यामुळे सातासमुद्रापार विठ्ठल मंदिर उभा राहिले. याच मंदिरात वारकरी सांप्रदायिक भजनाचे कार्यक्रम व पुजाविधी पार पडतात. या सर्व गोष्टींचा विस्तृत परामर्श त्यांनी शोधनिबंधात मांडला आहे.

योगायोगाने २३ नोव्हेंबरला कार्तिक शुद्ध एकादशी असल्यामुळे प्रा. होनमाने यांनी सातासमुद्रापार मॉरिशेश येथील विठ्ठल मंदिरात वारकरी कीर्तन सादर केले.तंजावरची मराठी कीर्तन परंपरा याविषयावर शिवाजी विद्यापीठाची विद्यावाचस्पती ही पदवी संपादन केली. त्यांचे कीर्तन परंपरा, भजनी मालिका यासह संत साहित्य व स्त्रीवादी साहित्य यावर ग्रंथ व शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत.

---

दै. केसरी 8/12/23



कुंडल येथील प्रा.डॉ.धनंजय होनमाने हे मॉरिशस येथील विद्यापिठामध्ये शोधनिबंध सादर करताना.

## 'क्रांतिअग्रणी'च्या डॉ.धनंजय होनमाने यांचा मॉरीशसमध्ये डंका

### शोधनिबंधाचे वाचन व किर्तन

केसरी वृत्तसेवा

कुंडल: येथीलक्रांतिअग्रणीडा. जी.डी.बापूलाडमहाविद्यालयातील प्रा.डा.धनंजय होनमाने यांनी मारिशस येथे झालेल्या मॉरिशस विद्यापीठ, (मोका) महात्मा गांधी इन्स्टिट्यूट, (मोका) मॉरिशस व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने भारत मॉरिसेश आंतरसांस्कृतिक, राजनैतिक संबंध, कला साहित्य आणि संस्कृती यावरील प्रभाव याविषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.धनंजय होनमाने यांनी 'मॉरिशसमधील वारकरी संप्रदायाचा उगम व विकास' या विषयावर शोध निबंध सादर केला.

डॉ. होनमाने यांनी या शोधनिबंधात मॉरिशस येथे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय कसा पध्दतीने रूढ झाला या गोष्टीचा शोध घेऊन १८६४ मध्ये महाराष्ट्रातील पवार नावाची एक व्यक्ती मजूर म्हणून मॉरिशसला आणण्यात आली. नित्यनेमाने हरिपाठ भजन व पुजा अर्चा करून विठ्ठलाप्रतीचा भक्तिभाव अखंड जतन केला.मॉरिशस सरकारनेही कुणाच्याही धार्मिक भावनेला अडथळा न आणता मुक्त स्वातंत्र्य बहाल केले. त्यामुळेच सातासमुद्रापार महाराष्ट्रातील विठ्ठल मंदिर तिथे उभा राहिले. याच मंदिरात वारकरी सांप्रदायिक भजनाचे कार्यक्रम व पुजाविधी पार पडतात. या सर्व गोष्टींचा विस्तृत परामर्श त्यांनी आपल्या शोधनिबंधात मांडला आहे. २३ नोव्हेंबरला कार्तिक शुद्ध एकादशी असल्यामुळे प्रा. होनमाने यांनी सातासमुद्रापार मॉरिसेश येथील विठ्ठल मंदिरात वारकरी कीर्तन सादर केले.

डा. होनमाने यांनी संत ज्ञानेश्वरवसंतएकनाथयांचीगौळण याविषया वर एम.फिल पदवी तर तंजावरची मराठी कीर्तनपरंपरा याविषयावर शिवाजी विद्यापीठाची विद्यावाचस्पती ही पदवी संपादन केली आहे. त्यांनी साहित्यक्षेत्रात मिळविलेल्या यशाबद्दल व मॉरिशससारख्या देशात जाऊन किर्तन परंपरेवर शोधनिबंध सादर करुन महाविद्यालयाचे नाव उंचावल्याबद्दल क्रांति उद्योग समुहाचे प्रमुख आमदार अरुण लाड, क्रांती दुध संघाचे अध्यक्ष किरण लाड, चंद्रकांत रोकडे, प्रकाश लाड,क्रांती चे चेअरमन शरद लाड, प्राचार्य मेजर डॉ.आर. एस.डुबल, प्रा.डॉ.प्रताप लाड यांनी त्यांचे अभिनंदन केले.

December 2023

# डॉ.जी.डी. बापू लाड महाविद्यालयाचा महिलांना बॉक्सिंग स्पर्धेत विजेतेपद

दै. केसरी ८/१२/२३

केसरी वृत्तसेवा

कुंडल : येथील क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत महिलांनी विजेतेपद मिळविले. दि. ५ डिसेंबर रोजी इस्लामपूर येथे झालेल्या सांगली विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत क्रांती अग्रणी डॉ. जी.डी.बापूलाडमहाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये महिला संघाने विजेतेपद मिळविले तर दोन विद्यार्थ्यांनीही यश संपादन केले.



कुंडल : विभागिय बॉक्सिंग स्पर्धेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांसमवेते प्राचार्य मेजर डॉ. आर.एस.डुबल, डॉ. प्रताप लाड, डॉ.जे.ए.पाटील, प्रा. विश्वास सावंत, डॉ.झेड. एच.संदे.

महाविद्यालायाच्या श्रुतिका भोकरे (बी. सी. ए. भाग २) हिने ६३ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक पटकाविला तसेच वैभवी जमदाडे (बी.कॉम भाग २) हिने ५७ किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक मिळविला तर प्रगती पाटील (बी.एस्सी भाग १) हिने ४८ किलो वजनी गटात तृतीय क्रमांक मिळवून सांघीक विजेतेपद मिळविले. तसेच विशाल जमदाडे याने ७५ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक व ऋतुराज पुजारी याने तृतीय क्रमांक पटकाविला. या सर्व खेळाडूंची ८ व ९ डिसेंबर रोजी होणाऱ्या आंतर विभागीय स्पर्धे करिता निवड झाली आहे.

या सर्व खेळाडूंना महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विश्वास सावंत, क्रीडाशिक्षक शशिकांत साबळे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष आ. अरुण लाड, उपाध्यक्ष चंद्रकांत रोकडे, प्रकाश लाड, किरण लाड, गोविंदराव डूबल, प्राचार्य मेजर डॉ. आर. एस. डूबल, ज्येष्ठ प्रा.डॉ. प्रताप लाड यांनी अभिनंदन केले.

दै. सकाळ ८/१२/२३

# डॉ. लाड महाविद्यालयाला बॉक्सिंग स्पर्धेचे विजेतेपद

सकाळ वृत्तसेवा

कुंडल, ता. ७ : येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत महिलांना विजेतेपद मिळविले. इस्लामपूर येथे झालेल्या सांगली विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत क्रांती अग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये महिला संघाने विजेतेपद मिळविले तर दोन विद्यार्थ्यांनीही यश संपादन केले.



कुंडल : विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांसमवेत क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड, प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल, प्रा. प्रताप लाड, प्रा. जे. ए. पाटील, प्रा. विश्वास सावंत, प्रा. संदे.

महाविद्यालयाच्या श्रुतिका भोकरे हिने ६३ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक पटकाविला तसेच वैभवी जमदाडे हिने ५७ किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक तर प्रगती पाटील हिने ४८ किलो वजनी गटात तृतीय क्रमांक मिळवून सांघिक विजेतेपद मिळविले. विशाल जमदाडे याने ७५ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक व ऋतुराज पुजारी याने तृतीय क्रमांक पटकाविला. या सर्व खेळाडूंची ८ व ९ डिसेंबर रोजी होणाऱ्या आंतरविभागीय स्पर्धेकरिता निवड झाली आहे. सर्व खेळाडूंना प्रा. विश्वास सावंत, शशिकांत साबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

# December 2023

## क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाचे बॉक्सिंग स्पर्धेत यश

वार्ताहर

कुंडल

येथील क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत महिला विजेतेपद मिळविले. ५ डिसेंबर रोजी इस्लामपूर येथे झालेल्या सांगली विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत क्रांती अग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये महिला संघाने विजेतेपद मिळविले तर दोन विद्यार्थ्यांनीही यश संपादन केले.

श्रुतिका भोकरे (बी.सी.ए. भाग २) हिने ६३ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक पटकाविला. वैभवी जमदाडे (बी.कॉम भाग २) हिने ५७किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक मिळविला तर प्रगती पाटील (बी.एससी भाग १) हिने ४८ किलो वजनी गटात तृतीय क्रमांक मिळवून सांघिक विजेतेपद मिळविले. तसेच विशाल जमदाडे(बी.सी.ए.३) याने ७५ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक व ऋतुराज पुजारी(बी.ए.भाग १) याने तृतीय क्रमांक पटकाविला. या सर्व खेळाडूंची ८ व ९ डिसेंबर रोजी होणाऱ्या आंतर विभागीय स्पर्धे करिता निवड झाली आहे.

यासर्व खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विश्वास सावंत, शशिकांत साबळे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी खेळाडूंचे आ. अरुण लाड, चंद्रकांत रोकडे, प्रकाश लाड, किरण लाड, गोविंदराव डुबल, प्राचार्य मेजर डॉ. आर.एस. डुबल, आदींनी अभिनंदन केले.



कुंडल : स्पर्धेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य मेजर डॉ. आर. एस. डुबल, ज्येष्ठ प्रा. डॉ. प्रताप लाड, प्रा. डॉ. जे. ए. पाटील आदी.



कुंडल येथे बॉक्सिंगमधील खेळाडूंचे प्राचार्य मेजर डॉ. आर. एस. डुबल, प्रा. डॉ. प्रताप लाड, क्रीडाशिक्षक प्रा. विश्वास सावंत आदींनी अभिनंदन केले.

## बॉक्सिंगमध्ये कुंडलच्या महिला संघास विजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कुंडल :** येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या महिला संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत विजेतेपद मिळविले.

इस्लामपूर येथे ५ डिसेंबर रोजी झालेल्या सांगली विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत संघाने विजेतेपद मिळविले. तसेच श्रुतिका भोकरे हिने ६३ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक, वैभवी जमदाडे हिने ५७ किलो गटात द्वितीय, प्रगती पाटील हिने ४८ किलो गटात तृतीय क्रमांक मिळवून सांघिक विजेतेपद मिळविले. तसेच विशाल जमदाडे याने ७५ किलो प्रथम, ऋतुराज पुजारी याने तृतीय क्रमांक पटकाविला. खेळाडूंची आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विश्वास सावंत, प्रतिनिधी हायस्कूलचे क्रीडाशिक्षक शशिकांत साबळे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष आमदार अरुण लाड, उपाध्यक्ष चंद्रकांत रोकडे, सचिव प्रकाश लाड, समन्वय समितीचे सचिव किरण लाड, खजिनदार गोविंदराव डुबल, प्राचार्य मेजर डॉ. आर. एस. डुबल, प्रा.डॉ. प्रताप लाड यांनी अभिनंदन केले.

# December 2023

## ‘क्रांतिअग्रणी’ महाविद्यालयाचे सांडगेवाडीत श्रमसंस्कार शिबिर



सांडगेवाडी : येथे शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी सुनील सूर्यवंशी यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल.

**पलूस : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांच्या मनात देशभक्ती, स्वच्छतेची आवड असेल तर तो जीवनात यशस्वी होतो. यशस्वी होण्यासाठी श्रमसंस्कार शिबिरे महत्त्वाची असतात, असे मत सांडगेवाडी तंटामुक्तीचे अध्यक्ष शशिकांत सांडगे यांनी व्यक्त केले.

क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत सांडगेवाडी येथे विशेष श्रमसंस्कार शिबिर आयोजित केले होते. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच अमर वडार हे होते. यावेळी उपसरपंच सुनील सूर्यवंशी, महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. आर. एस. डुबल उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. डुबल, अक्षता पवार यांनी मनोगत व्यक्त केले. ज्येष्ठ नेते तानाजी शिंदे, ग्रामपंचायत सदस्य सतीश शिंदे, अरुण शिंदे, बचत गटाच्या महिला आदी उपस्थित होते. आभार प्रा. डॉ. धनंजय होनमाने यांनी मानले.

दै. पुढारी

दि. 20/12/2023


December 2023

# यशासाठी श्रमसंस्कार शिबिर महत्वाचे : सांडगे

जनप्रवास । प्रतिनिधी

**पलूस :** विद्यार्थ्यांच्या मनात देशभक्ती, स्वच्छतेची आवड असेल तर तो जीवनात यशस्वी होतो. अन यशस्वी होण्यासाठी श्रमसंस्कार शिबिरे महत्वाची असतात असे मत सांडगेवाडीचे तंटामुक्तीचे अध्यक्ष शशिकांत सांडगे यांनी व्यक्त केले.

ते क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजने मार्फत विशेष श्रमसंस्कार शिबिर सांडगेवाडी (ता.पलूस) येथे आयोजित केले होते त्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच अमर शिवाजी वडार होते. यावेळी उपसरपंच सुनिल बापू सुर्यवंशी, महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डा.आर.एस.डुबल आदी उपस्थित होते.



**सांडगेवाडी (पलूस) येथे शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी सरपंच अमर वडार व उपसरपंच सुनील सूर्यवंशी यांचा सत्कार करताना प्राचार्य डा.आर एस.डुबल यावेळी उपस्थित मान्यवर.**

शशिकांत सांडगे पुढे म्हणाले या गावामध्ये सर्व जातीधर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहत आहेत. शिबिर काळात आपल्याला आमच्याकडून सर्व सहकार्य मिळेल. उपसरपंच सुनिल सुर्यवंशी म्हणाले सांडगेवाडीला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. आपल्या महाविद्यालयाने आमच्या गावची राष्ट्रीय सेवा योजनेच्या कॅम्पसाठी निवड केलीत याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत.गावाला इथून पुढे मिळणार्या पुरस्कारामध्ये आपले योगदान मोठे असेल. प्राचार्य डॉ.आर.एस.डुबल म्हणाले श्रमसंस्कार शिबिरामुळे विद्यार्थ्यांच्या पुढील जीवनासाठी प्रेरणा मिळते. सांडगेवाडी येथे होत असलेल्या श्रमसंस्कार शिबिरा तील विद्यार्थ्यांना एक उर्जा देऊन जाईल. यावेळी अक्षता पवार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी तानाजी शिंदे, ग्रा. सदस्य सतिश शिंदे,अरुण शिंदे, गणेश भिंगारदिवे,किरण माळी, आशा सुर्यवंशी, शोभा सांडगे, दिनेश सुर्यवंशी.अमोल पवार, आनंदराव पाटील, आदी उपस्थित होते.

ता- 20|12|2023 - जनप्रवास